MHRG100006322025

**नियमित दिवाणी दावा क्र. ३८/२०२५**
**निशाणी क्र. १२ वरील आदेश.**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत देण्यासाठी दोन महिन्याचा झालेला विलंब माफ करणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, ते वयोवृध्द असल्यामुळे व वयोमानामुळे त्यांना न्यायालयात हजर राहणे शक्य झालेले नाही. तसेच, प्रतिवादी यांना दिवाणी कामकाजाबाबत कोणतेही ज्ञान नाही. त्यामुळे कैफियत मुदतीत देवु शकले नाहीत. नैसर्गिक न्याय तत्व अनुसरून तसा विलंब माफ होउन कैफियत पटलावर घेणेची प्रतिवादी यांनी विनंती केली आहे. त्यांच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादीतर्फे म्हणणे दाखल करून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत नोंदवली. त्यांनी नमुद केले की, अर्जात नमुद केलेली कारणे ही चुकीची आहेत. त्यांनी प्रतिवादी क्र. १ व २ हे वयोवृध्द असल्याबाबत कोणताही वैदयकीय पुरावा सादर केलेला नाही. शेवटी, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. अभिलेखाची पडताळणी केली. युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करून घेण्यास प्रतिवादी यांना दोन महिना इतका विलंब झाला आहे. अर्जातील मजकूर पाहता, दाव्याच्या निकाल गुणदोषावंर होणेकरीता विलंब माफ करणे उचीत होईल. दाव्याचे स्वरूप पाहता प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई

करिता व अतिक्रमण हटवुन मिळण्याकरिता दाखल असल्याने दाव्याचा गुणदोषांवर निकाल होणेसाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचीत होईल. परंतु, वादीची झालेली गैरसोय विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीवर खर्च बसवुन कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे उचीत होईल. सबब, आदेश.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रू. ७५०/– वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आदेश क्र. १ मधील पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे पटलावर घेण्यात येते.

*(खुल्या न्यायालयात घोषित)*

JADHAV UDAY MAHADEV

Digitally signed by JADHAV UDAY MAHADEV
Date: 2026.02.12 16:12:52 +0530

महाड (यु. एम. जाधव)

दिनांक : १२/०२/२०२६ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
महाड, जि. रायगड.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav, 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Mahad. |
| Name of Stenographer | :- | Mr. B. T. Deshmukh |
| Date of decision / typed | :- | 12.02.2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 12.02.2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 12.02.2026 |